RNI No. MAHBIL/2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग दोन

वर्ष ८, अंक ८०] शुक्रवार, नोव्हेंबर २५, २०२२/अग्रहायण ४, शके १९४४ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १२.००

## असाधारण क्रमांक १४४

## प्राधिकृत प्रकाशन

### पनवेल महानगरपालिका

### जाहीर प्रकटन

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २१० अन्वये)

क्रमांक पमपा/नरवि/रस्ते/२६-२२/०४/२६९१/ २०२२

ज्याअर्थी, पूर्वाश्रमीच्या पनवेल नगरपरिषद हद्दीची सुधारित विकास योजना संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ३१(१) अन्वये अधिसूचना क्र. वि. यो. पनवेल (सु.)/टीपीव्ही-३/१६-९३/१६७६, दिनांक १६ मार्च १९९३ अन्वये मंजुरी दिलेली आहे आणि उक्त सुधारित विकास योजना दिनांक १५ मे १९९३ पासून अंमलात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, पनवेल नगरपरिषद हद्दीतील वगळलेल्या भागाची विकास योजना संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य यांनी अधिसूचना क्र. वि. यो. पनवेल (सु.)/ईपी/ टीपीव्ही-३/५३-९४/२८२०, दिनांक २७ मार्च १९९४ अन्वये मंजुरी दिलेली आहे आणि उक्त वगळलेल्या भागाची विकास योजना दिनांक १ जुलै १९९४ पासून अंमलात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, पनवेल नगररचना परियोजना क्र.१ (प्र. फे.) अंतिम शासनाने दिनांक ३१ ऑगस्ट २००९ रोजी मंजूर केली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३ च्या पोट-कलम (४) नुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक पनप -२९१४/व्ही आय फी सं.क्र. ३०१/प्र. क्र. ३५४/नवि-२३, दिनांक २६ सप्टेंबर २०१६ अन्वये पनवेल नगरपरिषदेचे संपूर्ण क्षेत्र व २९ महसुली गावांच्या क्षेत्रासाठी पनवेल महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली असून ती दिनाकं १ ऑक्टोबर २०१६ पासून अस्तित्वात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, पूर्वाश्रमीच्या पनवेल नगरपरिषद सुधारित मंजूर विकास योजना व मंजूर नगररचना परियोजना मधील रस्ते सध्याच्या सार्वजनिक वाहतुकीच्या दृष्टीने अरुंद आहेत व शहराची वाढती लोकसंख्या, वाहतूक व पार्कींगची गरज विचारात घेता खालील रस्त्यांचे रुंदीकरण करणे आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे - पनवेल येथील उक्त मंजूर विकास योजनेतील खालील विद्यमान ९.१४ मी. रूंदीचे रस्ते महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २१० अन्वये १२.१९ मी. रस्ता रुंदीकरणाची विहित रेषा करणेबाबत पनवेल महानगरपालिका स्थायी समिती सभा प्रशासकीय ठराव क्र. ६५१, दिनांक २३ सप्टेंबर २०२२ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे ;

| अ.क्र. (१) | रस्त्याचे नाव (२) | विद्यमान रस्त्याची रूंदी (३) | अंतिम रुंदीकरणाची विहीत रेषा (४) |
|---|---|---|---|
| १. | अंतिम भूखंड क्र.४१० पासून अंतिम भूखंड क्र.४१३/१ पर्यंत | ९.१४ मी. (३० फूट) | १२.१९ मी. (४० फूट) |
| २. | अंतिम भूखंड क्र.४१४ व अंतिम भूखंड क्र.४१५ लगतचा रस्ता | ९.१४ मी. (३० फूट) | १२.१९ मी. (४० फूट) |

आणि ज्याअर्थी, परिशिष्ट ‘ अ ’ व परिशिष्ट ‘ ब ’ मध्ये नमूद केलेल्या पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे पनवेल येथील वरील नमूद रस्ते महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २१० अन्वये नियमित रेषा विहित करण्याबाबत या कार्यालयाचे जाहीर प्रकटन जा.क्र.पमपा/नरवि/रस्ते/२६-२२/प्र.क्र. ०४/२५०२/२०२२, दिनांक ७ ऑक्टोबर २०२२ अन्वये महाराष्ट्र शासनाचे असाधारण **राजपत्र** क्र.१३०, दिनांक ८ ऑक्टोबर २०२२ व दिनांक १२ ऑक्टोबर २०२२ च्या दै. प्रातःकाल, दै. लोकसत्ता, दै. वृत्तमानस व दै. संध्याकाळ या वृत्तपत्रात प्रसिद्धी देऊन वरील प्रकटन शासनाच्या **राजपत्रात** प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात आलेल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, वरील रस्त्याच्या रुंदीकरणबाबत नागरिकांकडून विहित मुदतीत कोणत्याही हरकती व सूचना प्राप्त झाल्या नसल्याने रस्ता रुंदीकरण व संरेखांकन अंतिम मान्यता देण्यात आली आहे.

त्याअर्थी, मी, गणेश देशमुख, आयुक्त, पनवेल महानगरपालिका मला प्राप्त अधिकारांन्वये खालील परिशिष्ट ‘ अ ’ मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या रस्ता रुंदीकरण व परिशिष्ट ‘ ब ’ मध्ये नकाशात दर्शविल्या प्रमाणे रस्ता रुंदीकरण रेषा मंजूर करीत आहे. सदर परिशिष्ट ‘ अ ’ व परिशिष्ट ‘ ब ’ च्या प्रती नागरिकांच्या पाहणीकरिता सहायक संचालक, नगररचना विभाग, पनवेल महानगरपालिका यांचे कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ १ महिन्यांच्या कालावधीसाठी उपलब्ध राहील.

**परिशिष्ट-अ**

**रस्त्याचे संक्षिप्त विवरण**

रस्ता रुंदीकरणामुळे बाधित होणारे अंतिम भूखंड क्र. खालीलप्रमाणे आहेत :—

| अ.क्र. (१) | रस्त्याचे नाव (२) | विद्यमान रस्त्याची रूंदी (३) | अंतिम रस्ता रुंदीकरणाची विहित रेषा (४) | रस्ता रुंदीकरणामुळे बाधित होणारे अंतिम भूखंड क्र. (५) |
|---|---|---|---|---|
| १. | अंतिम भूखंड क्र.४१० पासून अंतिम भूखंड क्र.४१३/१ पर्यंत | ९.१४ मी. (३० फूट) | १२.१९ मी. (४० फूट) | ४१४, ४१०, ४११, ४१३/१ |
| २. | अंतिम भूखंड क्र.४१४ व अंतिम भूखंड क्र.४१५ लगतचा रस्ता | ९.१४ मी. (३० फूट) | १२.१९ मी. (४० फूट) | ४१४, ४१५ |

**टीप**.—वरील रस्ता रुंदीकरणाची प्रत्यक्ष आखणी करतेवेळी वरील बाधित जागेव्यतिरिक्त इतर जागा बाधित होत असल्यास सदरची जागा ही प्रस्तावित रस्ता रुंदीकरणाचा भाग समजण्यात येईल.

**परिशिष्ट - ब**

अंतिम रस्ता रुंदीकरण संरेखांकन दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या पाहणीकरिता सहायक संचालक, नगररचना विभाग, पनवेल महानगरपालिका यांचे कार्यालयात खुला ठेवण्यात आलेला आहे.

**गणेश देशमुख,**
आयुक्त ,
पनवेल महानगरपालिका.

पनवेल,
दिनांक २४ नोव्हेंबर २०२२.

# PANVEL MUNICIPAL CORPORATION

## Public Notice

Maharashtra Municipal Corporation Act, 1949 Section 210

Outward No. PMC/TPD/Roads/ 26-22/04/2791/2022

Whereas, the Director of Town Planning, Maharashtra State in exercise of the powers conferred by section 31(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 *vide* Notification No. DP-Panvel (R)/TPV-3/16-93/1676, dated 16th March 1993, sanctioned the Panvel Municipal Council's Revised Development Plan and the said Revised Development Plan come into force with effect from 15th May 1993 ;

And whereas, the Director of Town Planning, Maharashtra State *vide* Notification No.DP-Panvel (R)/EP/TPV-3/53-94/2820, dated 27th April 1994, sanctioned the Panvel Municipal Council's Revised Development Plan's Excluded Part Development Plan and the said Revised Development Plan's Excluded Part Development Plan come into force with effect from 1st July 1994;

And whereas, Panvel Municipal Council Town Planning Scheme (1st Variation) Final sanctioned by Government dated 31st August 2009 ;

And whereas, the Government in exercise of the powers conferred by sub section 4 of section 3 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949 *vide* Notification No. PNP.2914/VIP No.301/ C.R. 354/UD-23, dated 25th September 2016 constituted the Panvel Municipal Corporation for the areas of whole area of Panvel Municipal Council and 29 surrounding revenue villages, which come into force with effect from 1st October 2016 ;

And whereas, the roads shown in sanctioned development plan of erstwhile Panvel Municipal Council and Sanctioned Town Planning Scheme of Panvel town are narrow in consideration with existing heavy traffic and growing population of city, and needs to be widened ;

And whereas, the existing 9.14 m (30 Feet) wide road in the following table shown in erstwhile sanctioned development plan are decided to be widened to 12.19 m (40 Feet) by Hon. Standing Committee, Panvel Municipal Council in exercise of the powers conferred by section 210 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949 *vide* The Standing Committee Administrative Resolution No.651, dated 23rd September 2022 ;

| Sr.No. | Name of Road | Existing road width | Sanctioned road widening line |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1. | From final plot no.410 to final Plot No.413/1 | 9.14 m. (30 Feet) | 12.19 m. (40 Feet) |
| 2. | Road near to final Plot No. 414 and final Plot No.415 | 9.14 m. (30 Feet) | 12.19 m. (40 Feet) |

And whereas, Panvel Municipal Corporation has published the Notice *vide* No. PMC/TPD/ Roads/26-22/C.R.40/2502/2022, dated 7th October 2022 in *Maharashtra Government Extra-Ordinary Gazette* No. 130, dated 8th October 2022 and published in Daily Prat:kal, Daily Loksatta, Daily Vruttmanas and Daily Sandhyakal newspapers on 12th October 2022 for inviting suggestions and objections regarding above mentioned proposed roads under section 210 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949. as shown in the Annexure 'A' and Annexure 'B' from the public thereof within 30 days from the date of publication of the notice in *Maharashtra Government Extra-Ordinary Gazette* ;

And whereas, no any suggestions and objections received from public within prescribed period so that proposed road widening line has been sanctioned.

Therefore, as per the powers delegated by Panvel Municipal Corporation to the Commissioner, Panvel Municipal Corporation and in exercise of the powers, I, Ganesh Deshmukh, Commissioner, Panvel Municipal Corporation here by sanctions the road widening as mentioned in the Annexure 'A' and plan appended hereto Annexure 'B' showing the alignment of new road is kept open for the inspection of general public on all working days and in working hours in the office of the Assistant Director of Town Planning, Panvel Municipal Corporation for a period of one month.

*Annexure - A*

**Description of Road**

Details of affected final plot numbers by the final sanctioned road widening are as below :—

| Sr.No. (1) | Name of Road (2) | Existing Road Width (3) | Sanctioned Road Widening Line (4) | Affected Final Plot Numbers (5) |
|---|---|---|---|---|
| 1. | From final Plot No.410 to final Plot No.413/1 | 9.14 m. (30 Feet) | 12.19 m. (40 Feet) | 414, 410, 411, 413/1 |
| 2. | Road near to final Plot No.414 and final Plot No.415 | 9.14 m. (30 Feet) | 12.19 m. (40 Feet) | 414, 415 |

*Note*.—Other than above listed final plot numbers, if any other final plot numbers existed while laying out the road widening then it will also be the part of the above sanctioned road widening.

*Annexure - B*

Plan showing final sanctioned road widening alignment is kept open for Inspection in the office of the Assistant Director of Town Planning, Panvel Municipal Corporation.

GANESH DESHMUKH,
Commissioner,
Panvel Municipal Corporation.

Panvel,
dated 24th November, 2022.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHEDAT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD,MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.